


दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com




अजित दादांचा राजकीय जीवन प्रवास... पान २

वर्ष : ०५ | अंक : १६७, पाने : ०६, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.२९ जानेवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# ‘दादा’ नावाचं वादळ शमलं !

## ना तांत्रिक अडचण, ना पायलटची चूक; अजितदादांची अकाली एक्झिट



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, पुणे :** उपमुख्यमंत्री अजित पवारांचं आज सकाळी अपघाती निधन झालं. मुंबईहून बारामतीला जात असताना त्यांच्या विमानाला अपघात झाला. या अपघातात विमानातील सर्वच्या सर्व ५ जण दगावले. अजित पवारांच्या अकाली निधनानं राज्यावर शोककळा पसरली आहे. कार्यतत्पर, वक्तशीर, दिलखुलास व्यक्तिमत्व हरपल्याची भावना अजित पवारांच्या निधनानंतर जनमानसातून व्यक्त होत आहे.

विमान अपघातानंतर प्राथमिक तपास अहवाल समोर आला आहे. दुर्घटनाग्रस्त बॉम्बार्डियर लियरजेट-४५ विमान उड्डाणासाठी योग्य होतं. त्यात कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक अडचणी, समस्या नव्हत्या, अशी माहिती तपास अहवालात आहे. आज तकनं याबद्दलचं वृत्त दिलं आहे. प्राथमिक तपासानुसार, विमानात असलेल्या दोन्ही पायलट परवानाधारक होते. ते वैद्यकीयदृष्ट्या तंदुरुस्त होते.

विमान अपघातात अजित पवारांसह पाच जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. त्यानंतर राज्यावर शोककळा पसरली. अजित पवारांचं पार्थिव आधी बारामतीमधील रुग्णालयात नेण्यात आलं. सध्या ते विद्या प्रतिष्ठानच्या प्रांगणात अंत्य दर्शनासाठी ठेवण्यात आलं आहे. अजित पवारांचं अखेरचं दर्शन घेण्यासाठी प्रांगणात जनसागर लोटला आहे. अजित पवारांच्या पार्थिवावर आज अंत्यसंस्कार होतील.

बारामतीत अपघातग्रस्त झालेल्या



विमानाचा नोंदणी क्रमांक VT-SSK होता. हे चार्टर्ड विमान VSR व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेडकडून चालवण्यात येत होतं. विमानात कोणताही तांत्रिक अडचण नव्हती. त्याबद्दलचं एअरवर्दीनेस प्रमाणपत्र १० सप्टेंबर २०२५ रोजी जारी करण्यात आलं होतं. त्याची वैधता १४ सप्टेंबर २०२६ पर्यंत होती. विमानाचे प्रमुख पायलट असलेल्या सुमित कपूर यांच्याकडे १५ हजार पेक्षा अधिक तास विमान उडवण्याचा अनुभव होता. तर को-पायलट शांभवी पाठक यांच्या गाठिशी दीड हजार तास विमान उडवण्याचा अनुभव होता. दोघांच्या वैद्यकीय चाचण्या २०२५ मध्येच झाल्या होत्या. या चाचणीची वैधतादेखील २०२६ पर्यंत होती. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीच्या प्रचारासाठी अजित पवार मुंबईहून बारामतीला जात होते. त्यावेळी त्यांच्या विमानाला अपघात झाला. दाट धुक्यामुळे दृश्यमानता कमी असल्यानं पहिल्या प्रयत्नात लँडिंग झालं नाही. त्यामुळे पायलटनं दुसऱ्यांदा लँडिंगचा प्रयत्न केला. पण हा प्रयत्न विमानातील सगळ्यांच्याच जीवावर बेतला.

## विमान अपघातात अजित पवार यांचे दुःखद निधन !

बुधवार, २८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी बारामती येथे झालेल्या एका भीषण विमान अपघातात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे दुःखद निधन झाल्याची धक्कादायक बातमी समोर आली आहे.

**या दुर्घटनेबाबतचे सविस्तर वृत्त खालीलप्रमाणे :**

बारामतीत विमान कोसळून उपमुख्यमंत्री अजित पवारांसह ५ जणांचा मृत्यू

महाराष्ट्रासाठी अत्यंत मोठी आणि दुर्दैवी बातमी...

राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांचे आज सकाळी बारामती विमानतळावर झालेल्या विमान अपघातात निधन झाले आहे. या भीषण अपघातात अजित पवारांसह विमानातील एकूण ६ जणांचा मृत्यू झाला असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

- **नेमकं काय घडलं?**

अजित पवार आज सकाळी मुंबईहून एका खाजगी विमानाने (Lear Jet ४५) बारामतीकडे रवाना झाले होते. आगामी जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या बारामतीत चार जाहीर सभा आयोजित करण्यात आल्या होत्या. सकाळी साधारण ८:४५ च्या सुमारास विमान बारामती विमानतळाच्या धावपट्टीवर उतरत असताना हा अपघात झाला.

**: महत्त्वाचे मुद्दे :**

**वेळ :** सकाळी ८:४५ वाजता.

**ठिकाण :** बारामती विमानतळ, महाराष्ट्र.

**कारण :** लँडिंग दरम्यान तांत्रिक बिघाडामुळे अपघात.

**मृतांची संख्या :** ५ (अजित पवारांसह).

**टीप :** प्रशासन आणि नागरी विमान वाहतूक संचालनालय (DGCA) द्वारे या अपघाताची सविस्तर चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

प्राथमिक अहवालानुसार लँडिंगच्या वेळी विमानाला तांत्रिक अडचण आली, ज्यामुळे वैमानिकाचे नियंत्रण सुटले. विमान धावपट्टीच्या बाजूला जाऊन आदळले आणि त्यानंतर विमानाने भीषण पेट घेतला. बघता बघता संपूर्ण विमान आगीच्या भक्ष्यस्थानी पडले.

- **दुर्घटनेतील मृतांची माहिती..**

या विमानात अजित पवारांसोबत त्यांचे सुरक्षा रक्षक आणि चालक दलाचे सदस्य असे एकूण ६ जण होते. या सहाही जणांचा या भीषण आगीत होरपळून मृत्यू झाला आहे. घटनास्थळी अग्निशमन दल आणि स्थानिक पोलिसांनी तातडीने धाव घेत बचावकार्य सुरू केले, मात्र आगीची तीव्रता एवढी मोठी होती की कोणाचेही प्राण वाचवता आले नाहीत.

- **सर्वत्र शोककळा..**


अजित पवार यांच्या निधनामुळे संपूर्ण महाराष्ट्र राज्यावर शोककळा पसरली आहे. राजकारणातील एक कणखर नेतृत्व आणि 'कार्यसम्राट' म्हणून ओळखले जाणारे दादा अशा प्रकारे अचानक एक्झिट घेतील, यावर कोणाचाही विश्वास बसत नाहीये. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इतर सर्वपक्षीय नेत्यांनी या घटनेवर तीव्र दुःख व्यक्त केले आहे.

## ‘हा निव्वळ अपघात, यात राजकारण नाही’ : शरद पवार

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं आज विमान अपघातात निधन झालं आहे. या घटनेवर अजित पवार यांचे काका तथा महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आपली पहिली प्रतिक्रिया दिली आहे. महाराष्ट्राच कधीही न भरुन निघणारं असं नुकसान या घटनेमुळे झालं आहे. तसेच हा निव्वळ अपघात आहे. यात राजकारण नाही, अशी प्रतिक्रिया शरद पवार यांनी दिली आहे. शरद पवार यावेळी खूप भावूक झालेले बघायला मिळाले. त्यांना बोलता देखील येत नव्हतं. तसेच आपण आज मीडियासमोर येणार नव्हतो, असंही शरद पवारांनी आपली प्रतिक्रिया देताना नमूद केलं.

**शरद पवार काय म्हणाले?**

▶ महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं अपघाती निधन झालं. महाराष्ट्राला हा प्रचंड मोठा धक्का आहे. एक कर्तृत्वान नेत्याला



महाराष्ट्र आज मुकला आहे. हे जे नुकसान झालं ते भरुन निघणारं नाही. मी आज मीडियासमोर येणार नव्हतो. पण काही जणांनी या अपघातामागे काही तरी राजकारण आहे, अशा प्रकारची भूमिका घेतली. याच्यात राजकारण नाही. हा निव्वळ अपघात आहे. त्याच्या यातना महाराष्ट्राला आणि आम्हा सर्वांना होत आहेत. कृपा करुन इथे राजकारण नाही एवढंच सांगायचं आहे, असं शरद पवार म्हणाले.

अजित पवार यांचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी विद्या प्रतिष्ठानच्या



प्रांगणात अजित पवार यांचं पार्थिव आता बारामतीत विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात ठेवण्यात आले आहे. अजित पवार यांना अखेरचं पाहण्यासाठी कार्यकर्त्यांची मोठी गर्दी विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात जमली आहे. अजित पवार यांना बारामतीच्या मेडिकल कॉलेजमधून विद्या प्रतिष्ठानच्या प्रांगणात नेण्यात येत आहे. रुग्णालयाच्या बाहेर देखील मोठी गर्दी जमली आहे. अजित दादा अमर रहे, अशा घोषणा कार्यकर्त्यांकडून केल्या जात आहेत.

अनेक कार्यकर्त्यांचा आक्रोश सुरु आहे. अनेक दिग्गज नेते ढसाढसा रडत आहेत. अजित पवार हे पक्षाचे प्रमुख होते. त्यांनी दाखवलेल्या दिशेकडे पाऊल ठेवून नेते राजकारण करत होते. त्यामुळे आम्ही पोरके झालो, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादीचे नेतेमंडळी देताना दिसत आहेत.

## राज्यपालांतर्फे श्रद्धांजली !

- महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातात झालेल्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातात झालेल्या अकाली निधनामुळे तीव्र दुःख झाले. दिवंगत अजित पवार यांच्या आत्म्यास ईश्वर सद्गती देवो व पवार यांच्या कुटुंबीयांना, सहकाऱ्यांना आणि असंख्य समर्थकांना हा दुखद प्रसंग सहन करण्याचे धैर्य प्रदान करो, ही प्रार्थना करतो, असे राज्यपालांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.

## मुख्यमंत्री फडणवीस यांची शोकमग्न श्रद्धांजली

- जमिनीशी घट्ट नाळ असलेले जननेते, माझे मित्र आणि सहकारी, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा विमान अपघातात मृत्यू झाल्याची घटना मनाला अत्यंत व्यथित करणारी आहे. मनाला चटका लावणारी आहे. मन सुन्न झाले आहे. भावना व्यक्त करण्यासाठी माझ्याकडे शब्द नाहीत, अशा शोकमग्न भावना व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री, राज्य उत्पादन शुल्क मंत्री अजित पवार यांना शोकमग्न श्रद्धांजली अर्पण केली आहे.

‘माझा दमदार आणि दिलदार मित्र मी गमावला आहे. माझ्यासाठी ही वैयक्तिक हानी आहे. हे कधीही भरून न येणारे नुकसान आहे. आजचा दिवस महाराष्ट्रासाठी अतिशय कठीण आहे. मी दादांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या संपूर्ण कुटुंबियांच्या आणि राष्ट्रवादी काँग्रेस परिवाराच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. या अपघातात अन्य ४ जणांचा मृत्यू झाला. त्यांच्याही कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत, असे नमूद करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

## माझा मोठा भाऊ गेल्याची भावना : उपमुख्यमंत्री शिंदे

- राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाची बातमी अविश्वसनीय आणि धक्कादायक आहे. ते माझ्यापेक्षा अनुभवाने आणि वयानेही मोठे होते. त्यांच्या निधनाने माझा मोठा भाऊ गेल्याची भावना माझ्या मनात आहे. महाराष्ट्रासाठी आजचा काळा दिवस असून एक दूरदर्शी, स्पष्टवक्ता आणि अतिशय अभ्यासू नेता आपण गमावला आहे. महायुती सरकारमधले ते केवळ माझे सहकारी नव्हते तर माझे चांगले मित्रही होते. त्यांचं अकाली जाणं जीवाला चटका लावणारं आहे, अशा भावपूर्ण शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी श्रद्धांजली वाहिली.

उपमुख्यमंत्री शिंदे आपल्या शोकसंदेशात म्हणतात की, महाराष्ट्र त्यांना दादा म्हणून ओळखायचा आणि ते तसे होते. त्यांच्याकडे ‘वेळ’ साधण्याचा अप्रतिम गूण होता. त्यांच्या कामाचा झपाटा आणि निर्णयक्षमता आम्ही सगळ्यांनी अनुभवली आहे. मी केवळ सहकारी म्हणूनच नाही तरी मित्र म्हणून सुद्धा त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या पैलुंना जवळून पाहिलं आहे.

आपल्या निर्णयाचा लोकांच्या जीवनावर कसा आणि काय परिणाम होतो, याचा अभ्यास करायला हवा असा त्यांचा आग्रह असायचा. त्यामागे चूका काढण्याची नव्हे तर, त्यांची पुनरावृत्ती होऊ नये याची तळमळ असायची. आज दादा आपल्यात नाहीत ही कल्पना सुद्धा मनाला पटत नाही. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे शेवटी म्हणतात.

# अजित दादांचा राजकीय जीवन प्रवास...



अगदी धडाडीचे नेते म्हणून अजित पवारांची देशभरात ओळख होती. अजित पवारांची राजकीय कारकीर्द मात्र वाखाणण्याजोगी राहिली. अजित पवार यांचा जन्म २२ जुलै १९५९ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील देवळाली प्रवरा येथे झाला. बी.कॉम झालेल्या अजित पवारांनी शेती व्यवसाय सांभाळत राजकारणात प्रवेश केला. ते लोकसभा सदस्य, सात वेळा विधानसभा सदस्य, विविध खात्यांचे मंत्री आणि अनेक वेळा उपमुख्यमंत्री राहिले. वित्त, नियोजन, ऊर्जा, जलसंपदा, ग्रामीण विकास यांसारखी महत्त्वाची खाती त्यांनी प्रभावीपणे हाताळली. त्यांच्या कार्यकाळात पाणी व्यवस्थापन, ऊर्जा प्रकल्प आणि आर्थिक नियोजन यांना विशेष महत्त्व देण्यात आले. स्पष्टवक्तेपणा, प्रशासनावर मजबूत पकड आणि झटपट निर्णयक्षमता यामुळे त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. अजित पवारांची राजकीय कारकीर्द ही चढ-उतारांनी भरलेली, पण तितकीच प्रभावी ठरलेली होती.

भल्या पहाटे कामाला सुरुवात करणारा, फाईल्सवर थेट निर्णय घेणारा आणि कठोर प्रशासक अशी अजित पवारांची प्रतिमा होती.अजित पवार यांनी १९८२ साली स्थानिक राजकारणातून आपल्या राजकीय प्रवासाची सुरुवात केली. बारामती परिसरात त्यांनी संघटनात्मक बांधणी करत जनतेशी थेट संपर्क साधला. १९९१ मध्ये ते पहिल्यांदा लोकसभेवर निवडून गेले आणि खासदार म्हणून संसदेत पोहोचले. या टप्प्यावरच त्यांची ओळख एक आक्रमक आणि अभ्यासू नेता अशी झाली.१९९३ साली शरद पवार मुख्यमंत्री असताना अजित पवार यांना मंत्रिमंडळात संधी मिळाली. त्यानंतर त्यांनी जलसंपदा, अर्थ, नियोजन यांसारखी महत्त्वाची खाती सांभाळत प्रशासनावर आपला ठसा उमटवला. विशेषतः सिंचन प्रकल्प आणि सहकार क्षेत्रातील त्यांच्या भूमिकेमुळे ते कायम चर्चेत राहिले. पुणे जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्षपद आणि साखर कारखान्यांशी असलेला त्यांचा संबंध यामुळे ग्रामीण भागात त्यांचा प्रभाव अधिक वाढला. २०१० मध्ये काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी सरकारमध्ये अजित पवार यांची उपमुख्यमंत्रीपदी नियुक्ती झाली आणि यानंतर त्यांच्या राजकीय कारकीर्दीला नवे वळण मिळाले. पुढील काळात वेगवेगळ्या राजकीय समीकरणांमध्ये त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

सात वेळा उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेण्याचा विक्रम त्यांच्या नावावर नोंदवला गेला, जो महाराष्ट्राच्या राजकारणात दुर्मिळ मानला जातो. जुलै २०२३ पासून त्यांनी पुन्हा एकदा उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारत राज्याच्या राजकारणात आपले निर्णायक अस्तित्व सिद्ध केले. युती सरकारच्या काळात आलेली लाडकी बहीण योजनेमुळे देखील अजित पवार आपल्या लाडक्या बहिणींच्या मनात घर करण्यास समर्थ ठरले. पवारांचे गुलाबी जॅकेट देखील त्याकाळात मोठा चर्चेचा विषय ठरले होते.

चार दशकांहून अधिक काळाचा अनुभव, रणनीतीची जाण आणि संघटनात्मक ताकद यामुळे अजित पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणातील 'सिक्सर' खेळणारे नेते मानले जातात. गेल्या चार दशकांहून अधिक काळ राजकीय अनुभव असलेले अजित पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणाचे एक कुशल रणनीतीकार आणि मजबूत प्रशासक मानले जात होते. विशेष बाब म्हणजे ज्या बारामतीमधून त्यांची सुरवात झाली त्याच बारामतीतमध्ये त्यांची प्राणज्योत मालवली. सगळ्यांच्या मनात दादा हे स्थान निर्माण करणारे नेतृत्व मात्र आज मातीआड गेले आहे. त्यांच्या जाण्याने पुन्हा एकदा महाराष्ट्राने मोठा चेहरा गमावला आहे. दादांच्या पावन स्मृतींना कोटी कोटी विनम्र अभिवादन आणि भावपूर्ण श्रद्धांजली...

**- बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# बांगलादेश क्रिकेट बोर्डाचा आत्मघातकी निर्णय



बांगलादेशने दुराग्रही भूमिका घेऊन भारतात होणाऱ्या टी २० विश्वचषक स्पर्धेत न खेळण्याचा निर्णय घेतला. बांगलादेशचा हा निर्णय म्हणजे आत्मघात आहे कारण बांगलादेश भारतात खेळला काय नि न खेळला काय भारतावर याचा काही परिणाम होणार नाही. भारतावरच नाही तर आंतरराष्ट्रीय क्रिकेटवरही याचा काहीही परिणाम होणार नाही. बांगलादेश क्रिकेट बोर्डाने भारतात न खेळण्याचा निर्णय घेतल्यावर आयसीसीने कठोर भूमिका घेत त्यांना थेट स्पर्धेबाहेर हाकलून स्कॉटलंडला विश्वचषक खेळण्याची संधी दिली. भारतात क्रिकेट न खेळण्याची भूमिका घेऊन बांगलादेश क्रिकेट बोर्ड आयसीसीवर दबाव टाकत होता त्यांच्या या दबावाला आयसीसी बळी पडली नाही उलट आयसीसीने बांगलादेशला त्यांची जागा दाखवून दिली. भारतात न खेळण्याचा निर्णय घेऊन बांगलादेश क्रिकेट बोर्डाने स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारून घेतली आहे कारण या स्पर्धेतून बाहेर पडावे लागल्याने बांगलादेश क्रिकेट बोर्डाला मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागणार आहे. या स्पर्धेतून माघार घेतल्याने बांगलादेश क्रिकेट बोर्डाचे पाच लाख डॉलर नोंदणी शुल्क जप्त होईल याशिवाय बांगलादेश क्रिकेट बोर्डाला आयसीसीकडून मिळणारी मोठी रक्कमही मिळणार नाही. आधीच आर्थिक अडचणीत असलेला बांगलादेश क्रिकेट बोर्ड यामुळे आणखी अडचणीत येईल पण बांगलादेश क्रिकेट बोर्डाला आणि त्यांच्या देशाला भारत द्वेषाने पछाडले असल्याने त्यांना ते दिसत नाही. बांगलादेश भारत द्वेषाने किती पछाडला आहे हेच बांगलादेशने त्यांच्या या कृतीतून दाखवून दिले आहे. सुरक्षेच्या कारणाने या स्पर्धेतून माघार घेत आहोत हे बांगलादेश क्रिकेट बोर्डाचे स्पष्टीकरण तर हास्यास्पदच आहे. भारतात खेळणाऱ्या परदेशी खेळाडूंना अतिउच्च दर्जाची सुरक्षा पुरवली जाते म्हणूनच जगातील सर्व खेळाडू भारतात खेळण्यासाठी उत्सुक असतात. भारतात खेळणाऱ्या परदेशी खेळाडूंच्या जिवाला धोका निर्माण झाला असा एकही प्रसंग अद्याप घडला नाही. बांगलादेशचेही अनेक खेळाडू भारतात अनेकदा खेळले आहेत त्यांच्या जीविताला कधी धोका निर्माण झाला ? उलट या स्पर्धेत न खेळण्याचा आपल्या बोर्डाचा निर्णय त्यांच्याच खेळाडूंना पटला नाही पण आपल्या खेळाडूंपेक्षा बांगलादेश क्रिकेट बोर्डाला पाकिस्तान महत्वाचा वाटतो. पाकिस्तानच्या नादी लागूनच बांगलादेशने हा निर्णय घेतला हे शाळकरी मुल ही सांगेल. विशेष म्हणजे ज्या पाकिस्तानसाठी बांगलादेशने हा निर्णय घेतला त्या पाकिस्तानने आयसीसीने डोळे वटारताच आपली तलवार म्यान करून या स्पर्धेत खेळण्यास होकार दिला. पाकिस्तानचा माजी कर्णधार वसीम अक्रमने तर आपल्या बोर्डाला खडसावताना बांगलादेश क्रिकेट बोर्डाचीही खिल्ली उडवली. पण भारत द्वेषाची पट्टी डोळ्यावर बांधल्याने बांगलादेशला हे दिसत नाही. वास्तविक बांगलादेश क्रिकेट बोर्डावर बीसीसीआयने जितके उपकार केले तितके कोणीही केले नसेल. बांगलादेशला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये प्रवेश मिळावा यासाठी भारतानेच प्रयत्न केला. भारतानेच बांगलादेशची बाजू आयसीसीमध्ये मांडली आणि त्यांना आंतरराष्ट्रीय क्रिकेटचे दरवाजे उघडून दिले. बांगलादेश क्रिकेटकडे पैसे नव्हते तेव्हा बांगलादेश क्रिकेटला पैसे मिळवून द्यावेत या उद्देशाने जगमोहन दालमिया जे त्याकाळात आयसीसीचे प्रमुख होते त्यांनी १९९८ साली बांगलादेशमध्ये मिनी विश्वचषक नावाची नॉक आउट क्रिकेट स्पर्धा भरवली ज्यात सर्व देशांचा सहभाग होता. ही स्पर्धेत बांग्लादेशात आयोजित करण्यात आल्याने बांगलादेश क्रिकेट बोर्ड आर्थिक दृष्ट्या सक्षम झाला. जगमोहन दालमिया यांनीच इतर देशांना बांग्लादेशात खेळायला लावले आणि त्यांना आंतरराष्ट्रीय ओळख मिळवून दिली पण बांगलादेश क्रिकेट बोर्ड देखील बांगलादेश सरकार प्रमाणे कृतघ्न निघाली. असो बांगलादेशने घेतलेला हा निर्णय बुमरांग ठरणार हे सांगायला कोणत्याही ज्योतिषाची गरज नाही. भारतात न खेळण्याचा निर्णय घेऊन बांगलादेश क्रिकेट बोर्डाने स्वतःच्या हाताने स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारून घेतली हे मात्र नक्की.

**- श्याम ठाणेदार**

# बुवाबाजी : आंबेडकरी विवेकाचा पराभव की सामाजिक आत्महत्या?

भारतीय समाजाच्या इतिहासात अंधश्रद्धा ही केवळ धार्मिक समस्या राहिलेली नाही; ती सत्ता, अर्थकारण आणि मानसिक गुलामी यांचे सर्वात प्रभावी साधन बनली आहे. विज्ञान, शिक्षण आणि लोकशाही यांच्या युगातही बुवाबाजी टिकून आहे, याचा अर्थ समाजाने आधुनिकतेचा स्वीकार केला असला तरी विवेकाचा स्वीकार केलेला नाही. विदर्भातील विक्तूबाबा ही केवळ एका व्यक्तीची कथा नाही; ती संपूर्ण समाजाच्या वैचारिक अपयशाची आरसेदर्शी कहाणी आहे. विदर्भातील मोठ्या बाबांपैकी एक म्हणजे विक्तूबाबा. नागपूर जिल्ह्यात त्याचे भव्य देवस्थान उभे आहे. आज हे देवस्थान कोट्यधीश बनले आहे. पण या देवस्थानामागील वास्तव वेगळे आहे. वास्तविक पाहता विक्तूबाबा हा मानसिकदृष्ट्या अपंग मुलगा होता. वयात आल्यानंतर स्त्रिया दिसल्या की चावायला धावायचा; म्हणून त्याच्या नातेवाईकांनी त्याच्या हातापायात बेड्या घातल्या. हाच पुढे बेडीवाले-विक्तूबाबा म्हणून प्रसिद्ध झाला. दलित समाजामध्ये या बाबाला फार मानाचे स्थान मिळाले आणि प्रचंड जनसमुदाय त्याच्यावर श्रद्धा ठेवू लागला. एका मानसिकदृष्ट्या अपंग व्यक्तीला देवत्व देणे, त्याच्या विकृतीला चमत्काराचे रूप देणे आणि त्याच्या नावावर कोट्यवधी रुपयांचे देवस्थान उभे राहणे हे श्रद्धेचे नव्हे, तर विवेकाच्या पराभवाचे लक्षण आहे. समाजाने जेव्हा प्रश्न विचारणे थांबवले, तेव्हा बुवाबाजी जन्माला येते. बुवाबाजी ही अंधश्रद्धेची आधुनिक आवृत्ती आहे. ती देवाच्या नावाने नव्हे, तर माणसाच्या नावाने चालते म्हणूनच ती अधिक धोकादायक आहे. बुद्धांचा विचार याच बुवाबाजीच्या मुळावर घाव घालणारा आहे.

बालपणी मी स्वतः विक्तूबाबाला पाहिले आहे. सतत घाणेरड्या शिव्या देणारा, हातापायात बेड्या असणारा हा बाबा; ज्याच्या भोवती भक्तांचा गराडा असायचा. त्याच्या प्रत्येक पागल हावभावाचा भक्त आपापल्या परीने अर्थ काढायचे. मोठ्या प्रमाणावर पेढे, नारळ, पैसे बाबाला वाहिले जायचे आणि त्याच वस्तू पुन्हा दुकानांत विक्रीला ठेवण्यात यायच्या. टी.बी., महारोग आणि कॅन्सरसारख्या गंभीर आजारांचे रुग्णही विक्तूबाबाकडे येताना मी पाहिले. त्यांच्या नातेवाईकांशी संवाद साधल्यावर बाबाच्या कृपेने रोग बरे होतात हा केवळ विश्वास नव्हे, तर अनुभव असल्याचा दावा ऐकून मी स्तब्ध झालो. कारण विक्तूबाबांची आई महारोगाची रुग्ण होती आणि ती बाबा आमटेंच्या दवाखान्यात दीर्घकाळ उपचार घेत होती. विक्तूबाबाच्या घाणेरड्या शिव्यांतूनही चांगला अर्थ काढण्याचा भक्तांचा अट्टाहास विलक्षण होता. काही भक्त तर मुद्दाम बाबाला त्रास देत, जेणेकरून त्याने शिव्या द्याव्यात. त्या शिव्या मोजून काही लोक सट्टा-जुगार लावत असत. हा प्रकार केवळ हास्यास्पद नव्हे, तर समाजाच्या मानसिक अधःपतनाचे प्रतीक होता. आजही काही लोक लग्नाची पत्रिका समाजात वाटण्यापूर्वी विक्तूबाबाच्या चरणी ठेवतात. हा केवळ श्रद्धेचा प्रश्न नाही; तो मानसिक गुलामीचा पुरावा आहे. जीवनातील प्रत्येक निर्णय स्वतःच्या बुद्धीने घेण्याऐवजी बाबाच्या आशीर्वादावर अवलंबून राहणे म्हणजे विवेकाचा त्याग होय.

बुद्धाने सांगितले अत्त-दीप-भव, म्हणजे स्वतःचा दिवा व्हा. पण आजचा समाज म्हणतो, बाबाचा दिवा व्हा. हा फरक केवळ शब्दांचा नाही; तो मानसिकतेचा आहे. बुद्धधम्माचा अर्थ देव बदलणे नव्हे, तर विचार बदलणे आहे. जो समाज बुद्धाचा धर्म स्वीकारूनही चमत्कार शोधतो, तो बुद्धाचा नाही, तर बुवांचा अनुयायी ठरतो. म्हणूनच बुवाबाजी ही केवळ धार्मिक समस्या नाही; ती बुद्धविचाराच्या पराभवाची चिन्हे आहेत. जर बुद्धाचा विचार खरोखर स्वीकारायचा असेल, तर बुवाबाजीला केवळ विरोध करणे पुरेसे नाही; तिच्या मुळावरच घाव घालावा लागेल. कारण बुद्धाचा मार्ग स्पष्ट आहे, श्रद्धेपासून विवेकाकडे, देवापासून मानवाकडे आणि चमत्कारापासून विज्ञानाकडे. बुद्धाने देव, चमत्कार आणि अंधश्रद्धा यांना थेट आव्हान दिले. कोणत्याही गोष्टीवर केवळ परंपरेमुळे, धर्मामुळे किंवा कोणाच्या सांगण्यामुळे विश्वास ठेवू नका; स्वतःच्या बुद्धीने तपासून पाहा हा बुद्धाचा मूलमंत्र होता. त्यामुळे बुद्धधम्म हा पूजा, कर्मकांड किंवा बाबागिरीचा धर्म नाही, तर विवेक, अनुभव आणि तर्काचा धर्म आहे. बुद्धाने सांगितले की दुःखाचे कारण बाहेर नाही; ते आपल्या आत आहे. त्यामुळे दुःखावर उपाय शोधताना देव, बाबा किंवा चमत्कार शोधण्याची गरज नाही; गरज आहे ती स्वतःच्या बुद्धीची. विडंबन असे की बुद्धधम्म स्वीकारलेल्या समाजातच बुवाबाजी फोफावली आहे. बुद्धाच्या नावाने धर्म स्वीकारणारा समाज बाबांच्या चरणी नतमस्तक होतो ही केवळ विसंगती नाही; ती बुद्धविचाराची विटंबना आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजाला केवळ अधिकार दिले नाहीत; त्यांनी त्याला विचार करण्याची शक्ती दिली. बाबासाहेबांचा धर्म हा देवाचा नव्हे, तर माणसाचा धर्म होता. बुद्धधम्म स्वीकारताना त्यांनी स्पष्ट सांगितले, श्रद्धा नव्हे, बुद्धी. त्यांनी अंधश्रद्धा, कर्मकांड आणि देववाद यांना स्पष्ट नकार दिला. पण आज प्रश्न उभा राहतोआपण बाबासाहेबांचे अनुयायी आहोत की त्यांच्या नावावर जगणारे भक्त? हजारो घरांमध्ये बाबासाहेब आंबेडकर आणि विक्तूबाबांचे फोटो शेजारी लावलेले दिसतात. हा केवळ प्रतीकात्मक विरोधाभास नाही; तो वैचारिक शून्याचा पुरावा आहे. दीक्षाभूमी ही केवळ भूभाग नाही; ती विवेकाची क्रांती आहे. ज्या भूमीवर बाबासाहेबांनी लाखो लोकांना अंधश्रद्धेपासून मुक्त केले, त्याच भूमीवर विक्तूबाबाचा सत्कार होणे म्हणजे बुद्धिवादाची सार्वजनिक हत्या आहे. याविरोधात मोजकेच बुद्धिवादी आवाज उठले; बहुसंख्य आंबेडकरी नेते मात्र गप्प राहिले. का? कारण भक्तांचा रोष, मतांचा तोटा आणि राजकीय नुकसान. इथे प्रश्न उभा राहतो राजकारणासाठी विवेकाचा बळी देणे ही आंबेडकरी चळवळ आहे का? जर हो, तर बाबासाहेबांचा विचार केवळ निवडणूक घोषणापत्रापुरता मर्यादित राहिला आहे, हे स्वीकारावे लागेल.

विक्तूबाबाचे देवस्थान आज कोट्यधीश आहे. हजारो भक्त दरवर्षी दर्शनाला येतात. नारळ, पेढे, पैसे, वस्त्र, दान या सगळ्यांतून एक प्रचंड अर्थव्यवस्था उभी राहिली आहे. बुवाबाजी ही आज केवळ धार्मिक नव्हे, तर आर्थिक उद्योग बनली आहे. प्रश्न असा आहे हा पैसा कुठून येतो? तो येतो गरीब, असुरक्षित आणि असहाय लोकांकडून. जेव्हा राज्य त्यांना आरोग्य, शिक्षण आणि रोजगार देण्यात अपयशी ठरते, तेव्हा ते बाबांकडे धाव घेतात. म्हणजेच बुवाबाजी ही व्यवस्थेच्या अपयशाची उपज आहे. टी.बी., कॅन्सर, महारोग यांसारख्या रोगांवर बाबाच्या कृपेने उपचार होतात, असा विश्वास म्हणजे विज्ञानाचा अपमान आहे. पण या विश्वासामागे असलेली मानसिकता अधिक धोकादायक आहे, आपण स्वतः काही करू शकत नाही, कोणीतरी चमत्कार करावा लागेल. ही मानसिकता म्हणजेच मानसिक गुलामी.

सामान्यतः अंधश्रद्धा ही ग्रामीण समाजाशी जोडली जाते. पण दलित समाजात तिचे अस्तित्व अधिक खोलवर आहे. कारण दलित समाजाने ऐतिहासिकदृष्ट्या सतत अपमान, शोषण आणि अन्याय सहन केला आहे. त्यामुळे त्याच्या मनात असुरक्षितता, भीती आणि आश्रयाची गरज निर्माण झाली आहे. बुवाबाजी ही त्या मानसिकतेचा परिणाम आहे. बाबासाहेबांनी दलित समाजाला मानसिक गुलामीतून मुक्त करण्याचा प्रयत्न केला. पण सामाजिक चळवळ दुर्बल झाल्यामुळे ती गुलामी नव्या रूपात परत आली, बुवाबाजीच्या रूपात. आज आंबेडकरी चळवळ राजकीयदृष्ट्या सक्रिय आहे. निवडणुका, मोर्चे, सभा, घोषणा सगळे सुरू आहे. पण सामाजिक चळवळ मात्र निष्प्रभ झाली आहे. बाबासाहेबांच्या मृत्यूनंतर सामाजिक परिवर्तनाची मशाल कोणीच उचलली नाही. परिणामी, बाबासाहेबांचा फोटो सर्वत्र दिसतो; पण त्यांचा विचार समाजात दिसत नाही. आंबेडकरी चळवळ जर खरोखरच बाबासाहेबांची वारसदार असती, तर बुवाबाजीविरोधात ती सर्वात पुढे उभी राहिली असती. पण वास्तव उलट आहे. बुवाबाजीवर टीका केली की भावना दुखावतात असा युक्तिवाद केला जातो. प्रश्न असा आहे, भावना जपायच्या की विवेक?

बुद्धाने सांगितले काहीही अंधश्रद्धेने स्वीकारू नका. बाबासाहेबांनी त्याच विचाराला आधुनिक संदर्भ दिला. पण आज बुद्धधम्म स्वीकारलेल्या समाजातच अंगात येणारे बुद्ध, अंगात येणारे बाबासाहेब दिसतात. हा विरोधाभास केवळ हास्यास्पद नाही; तो धोकादायक आहे. कारण जेव्हा विचाराऐवजी चमत्कार महत्त्वाचा ठरतो, तेव्हा समाज पुन्हा मध्ययुगात परत जातो. प्रश्न विक्तूबाबाचा नाही; प्रश्न आपला आहे. विक्तूबाबा ही समस्या नाही; समस्या म्हणजे त्याला देवत्व देणारा समाज. विक्तूबाबा उद्या नाहीसा झाला, तरी उद्या दुसरा बाबा तयार होईल. कारण समाजाची मानसिकता बदललेली नाही. जो समाज बाबासाहेबांच्या नावाने राजकारण करतो, तोच समाज बुवांच्या चरणी नतमस्तक होतो, हा विरोधाभास केवळ वैचारिक नाही, तर नैतिकही आहे. आज समाजासमोर प्रश्न स्पष्ट आहे, आपण बाबासाहेबांच्या बाजूने उभे राहणार की बुवांच्या? बाबासाहेब म्हणजे प्रश्न विचारण्याची परंपरा. बुवा म्हणजे प्रश्न न विचारण्याची गुलामी. बाबासाहेब म्हणजे विज्ञान, तर्क आणि मानवतावाद, बुवा म्हणजे चमत्कार, अंधश्रद्धा आणि भीती. दोन्ही एकत्र चालू शकत नाहीत.आता वेळ आली आहे की आंबेडकरी समाजाने आत्मपरीक्षण करावे. बाबासाहेबांचे फोटो घरात लावणे पुरेसे नाही; त्यांचा विचार जीवनात उतरवावा लागेल. जर तुमच्या घरात बुवाचा फोटो आहे, तर बाबासाहेबांचा फोटो केवळ सजावटीचा आहे, हे स्वीकारावे लागेल. जर तुम्ही बुवांच्या चरणी नतमस्तक होता, तर बाबासाहेबांच्या विचारांशी तुम्ही द्रोह करत आहात, हे मान्य करावे लागेल. आज गरज आहे ती निर्भीड वैचारिक क्रांतीची. बुवाबाजी विरोधात उभे राहणे म्हणजे धर्मविरोध नाही; ते मानवतावादाचे समर्थन आहे. अंधश्रद्धेविरोधात बोलणे म्हणजे समाजविरोध नाही; ते समाजाच्या मुक्तीसाठीचे युद्ध आहे. जर आंबेडकरी समाजाने आता प्रश्न विचारले नाहीत, तर भविष्यात बाबासाहेबांचा विचार केवळ पुस्तकांमध्ये उरेल आणि बुवाबाजी समाजावर राज्य करेल. म्हणूनच आजच निर्णय घ्या, देव नव्हे, विचार स्वीकारा! चमत्कार नव्हे, विज्ञान स्वीकारा! बुवा नव्हे, बाबासाहेब स्वीकारा! कारण विवेक हीच खरी क्रांती आहे आणि विवेकाशिवाय कोणतीही मुक्ती शक्य नाही !

**- प्रविण बागडे**
**नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

# प्रिय दादा..

रंगातआलेला डाव
मध्ये सोडला अर्धा
शोकाकुलस्थितीत
निवर्तले प्रिय दादा

दिलदारअंतःकरण
उमदा हा शहजादा
सांभाळे दिलाशब्द
परिपूर्णकरेलं वादा

स्पष्टपणे होय नाही
कुणा ना लावे नादा
विरळाअसला नेता
जीवापाडजपेशब्दां

चुकीला ताडण करे
मुळी ना आडपडदा
जनसंपर्क रे दांडगा
सेवाव्यग्रसदासर्वदा

खिलाडी वृत्तीत घेई
सहजते झेली निंदा
दूरदृष्टी विचार शक्ती
लढवैय्ये योध्दा खंदा

अजीत नाव हे सार्थ
लटपटेपराजयसुध्दा
पॉवरहाऊस आगळे
जन भावनेवर श्रध्दा

उदिष्टपूर्तता होताचं
मध्ये करी अलविदा
खेळ खेळते नियती
त्रोटक आयु मर्यादा

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

### वणई मेढीपाडा जि.प. शाळेला नवीन विद्युत पोल व तारा
### ॲड.गडग यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश



**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२८, डहाणू (पालघर) :** डहाणू तालुक्यातील वाणगावजवळील मौजे वणई मेढीपाडा येथील सुमारे ४५ ते ५० आदिवासी कुटुंबांना तसेच येथील जिल्हा परिषद शाळेला अखेर नव्या विद्युत पोल व तारांची सुविधा मिळाली आहे. दीर्घकाळापासून अपुऱ्या वीजपुरवठ्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक कामकाज तसेच ग्रामस्थांचे दैनंदिन जीवन मोठ्या प्रमाणात प्रभावित होत होते. वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, जुन्या तारांमुळे निर्माण होणाऱ्या अडचणी आणि सुरक्षिततेचा प्रश्न यामुळे नागरिकांत असंतोष होता. ही गंभीर समस्या ग्रामसभेत शाळेतील शिक्षक सुशील साळवी व ग्रामस्थांनी ठामपणे मांडली. त्यावेळी वणईचे सुपुत्र, युवा एल्गार आघाडीचे संस्थापक अध्यक्ष व शिवसेनेचे पालघर विधानसभा संघटक ॲड. विराज गडग यांनी सदर प्रश्न तातडीने सोडवण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर ॲड.गडग यांनी वाणगाव येथील महावितरण (एमएसईबी) कार्यालयात वारंवार भेटी देत संबंधित अधिकाऱ्यांकडे कैफियत मांडली व कामास गती देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला.

ॲड.विराज गडग यांच्या या अखंड प्रयत्नांना अखेर यश आले. बुधवार, दिनांक २८ जानेवारी २०२६ रोजी वीज कर्मचाऱ्यांनी पाड्यात तसेच शाळेपर्यंत आवश्यक त्या ठिकाणी नवीन विद्युत पोल उभारून नवीन विद्युत तारा टाकण्याचे काम पूर्ण केले. यामुळे वणई मेढीपाडा येथील जिल्हा परिषद शाळा व संपूर्ण पाड्याला सुरक्षित व नियमित वीजपुरवठा सुरू झाला आहे. या सुविधेमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला चालना मिळणार असून ग्रामस्थांच्या दैनंदिन कामकाजातही मोठी सोय होणार आहे. या कामाच्या वेळी कनिष्ठ अभियंता धनंजय सोनटक्के, अभियंता विशाल काळे, ॲड.विराज गडग, तुलसी गडग, कर्मचारी कृष्णा धांडे, दिनेश भोईर, संदीप गभाले, शाळेचे मुख्याध्यापक दिनेश साळवी तसेच ग्रामस्थ शंकर मेढा, सीताराम तल्हा, संतोष तल्हा, सुभाष तल्हा, रमेश तल्हा, अनिल मेढा, संतोष मेढा आदींचे सहकार्य लाभले. नागरिक व शाळेची दीर्घकालीन वीज मागणी पूर्ण झाल्याने शाळेतील शिक्षक सुशील साळवी व ग्रामस्थांनी ॲड.विराज गडग तसेच कर्मचारी कृष्णा धांडे यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत व अभिनंदन केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे पाड्याचा मूलभूत प्रश्न मार्गी लागल्याबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

### जनतेच्या सुख दुःखात धावुन येणारे नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले - गणेशराव रोकडे

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.२८, पालम (परभणी) :** बारामती येथे झालेल्या भीषण विमान दुर्घटनेत महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे बुधवार, दि.२८ जानेवारी २०२६ रोजी दुर्दैवी निधन झाले. या घटनेने संपूर्ण राज्यासह पालम तालुक्यावर शोककळा पसरली आहे. अजितदादांच्या निधनाची बातमी पालम शहरात कळताच शहरातील बाजारपेठ काही काळातच उत्सुर्तपणे पूर्ण बंद झाली. शिवसेना नेते गणेशराव रोकडे यांनी श्रद्धांजली अर्पण करून महाराष्ट्रातील एक धडाडीचा नेता, जनतेच्या सुख दुःखात तात्काळ धावून येणारे नेतृत्व काळाने हिरावून नेल्याच्या भावना व्यक्त केल्या. यावेळी शहरातील शिवसेना पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

### एका धडाडीच्या नेतृत्वाचा अस्त



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२७, नागपूर :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनाचे वृत्त ऐकून मन सुन्न झाले आहे. महाराष्ट्राच्या विकासकामांत अहोरात्र स्वतःला झोकून देणारा एक 'प्रशासनाचा वाघ' आज आपल्यातून निघून गेला आहे, हे स्वीकारणे कठीण आहे.

अजितदादा म्हणजे केवळ एक राजकारणी नव्हते तर ते शब्दाचे पक्के आणि कामाच्या बाबतीत शिस्तप्रिय लोकनेते होते. ओबीसी समाजाच्या प्रश्नांची त्यांना जाण होती आणि सत्तेत असताना त्यांनी नेहमीच विकासाचा समतोल राखण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या जाण्याने राज्याच्या राजकारणात आणि समाजकारणात कधीही न भरून निघणारी पोकळी निर्माण झाली आहे.

विलास महल्ले- भाजपा ओबीसी आघाडी जिल्हा महामंत्री (काटोल)

### एका कर्तृत्ववान नेतृत्वाचा अस्त - आ.सुधाकर अडबाले



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२८, चंद्रपूर :** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे निधन ही राज्याच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्राची कधीही भरून न निघणारी हानी आहे. दादा केवळ एक नेते नव्हते, तर प्रशासनावर जरब असलेला आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांची जाण असलेला एक कणखर आधारस्तंभ होते. शिक्षकांच्या प्रश्नांबाबत दादांचे कायमच एक संवेदनशील नाते राहिले. जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या मागणी संदर्भात आम्ही जेव्हा जेव्हा त्यांच्याकडे गेलो, तेव्हा त्यांनी प्रत्येक वेळी सकारात्मक भूमिका दर्शवली. अनेक महत्त्वाच्या बैठकांमध्ये त्यांनी ही योजना लागू करण्याच्या दृष्टीने सकारात्मकता दाखवून, त्याचा पाठपुरावा करण्याचे ठोस आश्वासन ही दिले होते. शिक्षकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांनी दाखवलेली तत्परता नेहमीच स्मरणात राहील. राज्याच्या आणि देशाच्या विकासात अजितदादांचे योगदान अतुलनीय आहे. विविध मंत्रिपदे भूषवताना आणि उपमुख्यमंत्री म्हणून काम करताना त्यांनी आपला कार्यकाळ अत्यंत अचूक, पारदर्शक आणि शिस्तबद्ध पद्धतीने सांभाळला. 'दादा' म्हणजे कामाचा धडाका आणि शब्दाचा पक्का माणूस, हीच त्यांची ओळख शेवटपर्यंत कायम राहिली. अजितदादा पवार यांना त्यांच्या निधनाबद्दल मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो आणि त्यांच्या परिवाराला या दुःखातून सावरण्याची शक्ती देवो.

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे कासा बाजारपेठ बंद

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२८, डहाणू (पालघर) :** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ नेते अजित पवार यांच्या विमान दुर्घटनेत दुर्दैवी निधनाचे वृत्त देशभर वाऱ्यासारखे पसरले. या दुःखद घटनेनंतर महाराष्ट्र सरकारकडून तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला असून, बुधवार, दिनांक २८ जानेवारी २०२६ रोजी शासकीय सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर पालघर जिल्ह्यात ही शोककळा पसरली असून, कार्यकर्त्यांसह सर्वसामान्य नागरिकांकडून तीव्र शोक व्यक्त करण्यात येत आहे. डहाणू तालुक्याचे मध्यवर्ती ठिकाण असलेली कासा




बाजारपेठ पूर्णतः बंद ठेवण्यात आली होती. व्यापारी, व्यावसायिक तसेच नागरिकांनी स्वयंप्रेरणेने आपले व्यवहार बंद ठेवत दिवंगत नेत्याला श्रद्धांजली वाहिली.

पालघर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची चांगलीच राजकीय ताकद असून, अजित पवार यांचा मोठा जनाधार आहे.

त्यामुळे त्यांच्या अचानक निधनाच्या वृत्ताने संपूर्ण जिल्ह्यात हळहळ व्यक्त करण्यात येत असून, अनेक ठिकाणी शोकसभा तसेच मोठमोठे श्रद्धांजली चे बॅनर लावण्यात आले आहेत. अजित पवार यांच्या निधनामुळे राज्याच्या राजकीय क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली असून, त्यांच्या कार्याची आणि नेतृत्वाची आठवण काढत कार्यकर्ते व नागरिक अश्रू अनावर करताना दिसत आहेत. पालघर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात शोकमय वातावरण पसरले आहे.

## गहू बियांणात शेतकऱ्यांची फसवणूक !

### शेतकऱ्यांना बसला मोठा फटका; शेतकऱ्यांनी केली नुकसान भरपाईची मागणी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२८, विसापूर (चंद्रपूर) :** बल्लारपूर तालुक्यातील पळसगाव येथील शेतकऱ्यांनी रब्बी हंगामात मशागत करून गव्हाची पेरणी केली. उत्तम उगवन क्षमता व भरघोस उत्पादन मिळेल असे गहू बियाणे असल्याचे अंकुर कंपनीच्या 'केदार' नावाचे वाण असल्याचा गवगवा केला.

मात्र गहू पिक ओंबीवर आल्यावर फसगत झाल्याची भावना शेतकऱ्यांत बळावली. याचा फटका शेतकऱ्यांना बसला आहे. कंपनीने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी,असी मागणी त्यांनी केली आहे. अंकुर कंपनीच्या 'केदार' गहू बियाणात भेसळ असल्याचा आरोप पळसगाव येथील प्रगतशील शेतकरी आशिष खाडे यांनी केला.



बल्लारपूर तालुक्यातील पळसगाव येथील शेतकऱ्यांनी रब्बी हंगाम डोळ्यासमोर ठेवून कोठारी येथील नैना कृषी केंद्रातून अंकुर कंपनीच्या 'केदार' गहू वाणाची बियाणे म्हणून खरेदी केले. त्याची शेतशिवारात पेरणी केली.

गव्हाचे पिक एकसारखे व दर्जेदार येणार असे बियाणे खरेदी करताना सांगण्यात आले. मात्र शेतशिवारातील पिक ओंबीवर आल्यावर 'केदार' नावाच्या गहू बियाणे भेसळयुक्त असल्याचे शेतकऱ्यांच्या लक्षात आले. यामुळे शेतकऱ्यांची फसगत झाल्याची भावना निर्माण झाली. यातून कंपनीच्या विरोधात शेतकरी आक्रोश व्यक्त करत आहे.

शेतकऱ्यांच्या फसवणुकीला कृषी विभाग जबाबदार असल्याचा आरोप पिडीत शेतकऱ्यांनी केला आहे.

**बियाणाची गुणवत्ता केवळ कागदोपत्री !**

नामांकित कंपनीच्या बियाणाची गुणवत्ता असल्याची बतावणी कृषी केंद्र चालक करतो. त्याच्या भूलथापांना शेतकरी बळी पडतो.अशाच प्रकार पळसगाव येथील शेतकऱ्यांच्या बाबतीत घडला. त्यांनी अंकुर कंपनीच्या 'केदार' गहू वाणाची खरेदी केली. मात्र कृषी विभागाच्या दुर्लक्षितपणामुळे गहू वाणाच्या भेसळीमुळे आशिष खाडे या शेतकऱ्यांनी बियाणाची गुणवत्ता केवळ कागदोपत्री असल्याचा आरोप केला. यामुळे गहू उत्पादनावर विपरीत परिणाम झाला आहे, असेही त्याने सांगितले.

---

पळसगाव येथील शेतशिवारात गहू पिकाची पाहणी केली. मात्र ज्या कंपनीच्या गहू बियाणे पेरणी केली. यामध्ये मोठी तफावत दिसून येत आहे. संबंधित शेतकऱ्यांचे यामुळे नुकसान झाले आहे. यासाठी नुकसान भरपाई कंपनीकडून देण्यात यावी. भविष्यात शेतकऱ्यांची फसवणूक बंद करावी.

**– अनिल मोरे (संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती, चंद्रपूर)**

## आ.किशोर जोरगेवार यांनी मुख्यमंत्र्यांची घेतली भेट

### चंद्रपुरातील राजकीय परिस्थितीची मुख्यमंत्र्यांना दिली माहिती

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२८, चंद्रपूर :** चंद्रपूर शहर महानगरपालिका निवडणुकीच्या निकालानंतर निर्माण झालेल्या राजकीय परिस्थितीबाबत आमदार किशोर जोरगेवार आणि चिमूर मतदारसंघाचे आ.कीर्तिकुमार भांगडिया यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबई येथील वर्षा बंगल्यावर भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी चंद्रपूरातील सद्यस्थितीची सविस्तर माहिती त्यांनी मुख्यमंत्र्यांना दिली. या भेटीदरम्यान परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून चंद्रपूर शहर महानगरपालिकेत सत्ता स्थापनेसाठी प्रयत्न सुरू ठेवण्याच्या स्पष्ट सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिल्याची माहिती आहे. चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्ष व काँग्रेस या दोन्ही पक्षांना स्पष्ट बहुमत मिळाले नसल्याने सध्या दोन्ही पक्षांकडे सत्ता स्थापनेची समान संधी आहे. या दिशेने दोन्ही पक्षांकडून हालचाली सुरू असून, सत्ता स्थापनेसाठी विविध राजकीय समीकरणे जुळवली जात आहेत. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी झालेल्या भेटीनंतर चंद्रपूरच्या राजकारणात नव्या समीकरणांची शक्यता निर्माण झाली आहे.

चंद्रपूर शहर महानगरपालिकेत भारतीय जनता पक्षालाही सत्ता स्थापनेची पूर्ण संधी असून, राज्याच्या सर्वांगीण विकासासह चंद्रपूर शहराच्या विकासाला गती देण्यासाठी महानगरपालिकेत भारतीय जनता पक्षाची सत्ता आणण्याचे प्रयत्न अधिक प्रभावीपणे करण्याच्या स्पष्ट सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी भेटी दरम्यान



दिल्या आहे. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात सुमारे ३० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक राज्यात आणली असून तसा करार केला आहे. या गुंतवणुकीतून चंद्रपूरातील स्टील उद्योगालाही चालना देण्यात येणार असून, त्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्था भक्कम होईल आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## खापरखेडा परिसरात ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

### ठिकठिकाणी ध्वजारोहण व सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२८, नागपूर :** देशभरात भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. याच उत्साहाचे प्रतिबिंब खापरखेडा परिसरातील गावोगावी पाहायला मिळाले.

खेडेगावांपासून ते शहरांपर्यंत सर्व सरकारी कार्यालये, शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्थांमध्ये ध्वजारोहण सोहळा भक्तीमय वातावरणात पार पडला. परिसरातील विविध ग्रामपंचायतींमध्ये लोकप्रतिनिधींच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. खापरखेडा औष्णिक वीज केंद्र मुख्य अभियंता गिरीश कुमरवार, खापरखेडा (चिचोली) ग्राम पंचायत सरपंच मीनाक्षी तागडे, भानेगाव ग्रामपंचायत सरपंच शालिनी चवरे, दहेगाव (रंगारी) ग्रामपंचायत सरपंच अर्चना चौधरी, रोहणा ग्रामपंचायत सरपंच चंद्रशेखर लांडे, सिल्लेवाडा ग्राम




पंचायत सरपंच मधुकर दुधाने, सिल्लेवाडा कोळसा खाण सब-एरिया कार्यालयात प्रबंधक राजू रंजन यांच्या हस्ते, तर सिल्लेवाडा कोळसा खाण कार्यालयात प्रबंधक राजेश ओढिया यांनी ध्वजारोहण केले. भानेगाव सब-एरियामध्ये प्रबंधक एस.के. पांडे यांनी तिरंग्याला सलामी दिली.

तर स्व. फूलचंद जैन मतिमंद शाळा रमेश जैन, शंकरराव चव्हाण इंग्लिश स्कूल मराविम संस्था सचिव ईश्वर राऊत, प्लाज्मा इंग्लिश स्कूल अमर जैन, महाराष्ट्र विद्यालय मुख्याध्यापक अरुण वडस्कर, शंकरराव चव्हाण विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय मुख्याध्यापिका वीणा पांडे, डी.ए.व्ही. प्राथमिक शाळा मुख्याध्यापक हरीश बलानी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शाळा समिती अध्यक्ष राजकुमार निकोसे, या व्यतिरिक्त, खापरखेडा पोलीस स्टेशन ठाणेदार हरीश रुमकर यांच्या हस्ते व भाजप कार्यालयात रमेशचंद्र जैन यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडले. नवीन बिना येथील बौद्ध महासभा, आम्रपाली व संघमित्रा महिला मंडळ, राहुल नवयुवक संघ आणि न्यू परिवर्तन मिशन स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने बौद्ध विहाराच्या पटांगणात भारतीय बौद्ध महासभा सभेचे कोषाध्यक्ष रविंद्र ढोके व जेष्ठ नागरिक तूळशिराम बागडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

ध्वजारोहणानंतर ठिकठिकाणी मिठाई आणि नाश्त्याचे वाटप करण्यात आले शालेय विद्यार्थी व तरुण वर्गात प्रचंड उत्साह होता कुणाच्या हातात तिरंगा होता, तर कुणी गालावर तिरंगा रंगवून उत्सवात सहभागी झाले होते. तरुणांनी मुख्य मार्गावरून भव्य 'तिरंगा रॅली' काढली. भारत माता की जय च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता याप्रकारे खापरखेडापरिसरात ७७ वा प्रजासत्ताक दिन अभिमानाने आणि उत्साहाने साजरा झाला.

# खापरखेडा औष्णिक वीज केंद्राच्या भेटी दरम्यान अजित 'दादां'चा शब्द!

## चिचोली ग्रामपंचायतला वाढवून दिले २५ लाख रुपये अनुदान

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२८, नागपूर :** राजकारणात 'ऑन द स्पॉट' निर्णयासाठी ओळखले जाणारे नेतृत्व म्हणजे अजितदादा पवार! अजित पवार राज्याचे ऊर्जामंत्री असतांना राष्ट्रवादी कांग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष अमर जैन यांच्या विनंतीवरून खापरखेडा औष्णिक वीज केंद्राला दिलेली भेट दिली होती.

राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष अमर जैन आणि चिचोलीचे माजी सरपंच हेमराज परिहार यांनी या ऐतिहासिक भेटीच्या आठवणींना उजाळा दिला आहे. त्यावेळी राज्याचे ऊर्जामंत्री असताना अमर जैन यांच्या आग्रहाखातर अजितदादांनी खापरखेडा येथील ५०० मेगावॅट प्रकल्पाची पाहणी करण्याचे मान्य केले होते या दौऱ्यात माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचीही उपस्थिती होती.



### अमर जैन व हेमराज परिहार यांनी जागवल्या आठवणी

हा दौरा केवळ तांत्रिक पाहणीपुरता मर्यादित नव्हता, तर स्थानिकांच्या हक्कासाठी दादांनी तिथे प्रशासकीय यंत्रणेला कामाला लावले होते.

प्रकल्प पाहणीदरम्यान चिचोली ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच हेमराज परिहार आणि अमर जैन यांनी एक महत्त्वाची मागणी दादांसमोर मांडली वीज केंद्राकडून मिळणारे अनुदान गावाच्या विकासासाठी अपुरे असल्याचे त्यांनी सांगितले. तक्रार ऐकताच दादांनी उपस्थित वीज अधिकाऱ्यांना जाब विचारला यावेळी कोणतीही फाईल प्रलंबित न ठेवता तिथेच २५ लाख रुपयांचे वाढीव अनुदान देण्याचे आदेश दिले. या निर्णयामुळे चिचोली ग्राम पंचायत परिसरातील नागरी सुविधांचे प्रश्न मार्गी लागले होते. अजितदादांची कामाची पद्धत ही नेहमीच प्रशासनाला शिस्त लावणारी राहिली आहे त्यांनी दिलेला तो आदेश आमच्या गावासाठी संजीवनी ठरला होता असे हेमराज परिहार यांनी सांगितले तर अमर जैन यांच्या मते, लोकप्रतिनिधीने लोकांच्या प्रश्नांवर कसे खंबीर उभे राहावे, याचे उदाहरण म्हणजे दादांची ती भेट होती. आजही खापरखेडा परिसरातील विकासकामांची चर्चा निघते तेव्हा दादांनी दिलेल्या त्या वाढीव निधीचा उल्लेख आवर्जून केला जात असल्याचे अमर जैन यांनी सांगितले.

# अजित पवारांचा चंद्रपुरातील २८ जुलै २०२० रोजीचा पूरग्रस्तांचा शेवटचा दौरा ठरला





**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२८, चंद्रपूर :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बुधवार, दि.२८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी विमान दुर्घटनेत दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांच्या आठवणी मात्र चंद्रपुरात अजूनही ताज्या आहेत. अजितदादांचा चंद्रपूर महानगरातील शेवटचा दौरा २८ जुलै २०२० रोजी झाला होता. तेव्हा चंद्रपुरात मोठा पूर येऊन गेला. तत्कालीन अर्थमंत्री म्हणून ते पूरपरिस्थितीची पाहणी करण्यासाठी आले होते. पुराची समस्या नाल्याच्या अतिक्रमणामुळे होत असल्याचे त्यांच्या चाणाक्ष नजरेने हेरले. कशाचीच तमा न बाळगतात त्यांनी तेव्हा अतिक्रमणाबाबत कठोर भूमिका घेतली होती. तसेच ईरई नदीच्या खोलीकरणाच्या कामाची तात्काळ मंजूरी ही दिली होती. एक स्पष्ट बोलणारा, तातडीने निर्णय घेणारा, कठोर पण जनतेविषयी तळमळ असलेला हा नेता होता. विरोधी पक्षातील लोकांना ही भावेल, असे त्यांचे व्यक्तिमत्व होते. त्यामुळे त्यांच्या या शहरातील आठवणी ताज्या आहेत. त्या नेहमी चर्चिल्या जातात. पुढेही लोक त्यांना विसरणार नाहीत. त्यांना पावन स्मृतींना भावपूर्ण श्ध्दांजली.

कोविड परिस्थितीचा तो काळ होता. मॉस्क घालून स्वत: अजित पवार रहमत नगर वस्तीत फिरले. अतिक्रमित नाला व परिसरातील घरे बघितली. नंतर तेथील लोकांशी संवाद साधताना ते म्हणाले, ज्यांनी नाल्यावर घरे बांधली आणि नाला अडवला अशी काही घरे तोडावी लागेल. हा निर्णय कठोर असला तरी, तुमच्यामुळे परिसरातील ९५ टक्के नागरिकांना त्रास होत आहे. परंतु, आम्ही तुम्हालाही वाऱ्यावर सोडणार नाही. तर तुमच्यासाठी घरकुल योजना करू. कंत्राटदार नाल्यात मलबा टाकत असेल तर त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे आणि मलबा हटवला पाहिजे. इरई नदीच्या खालीकरणाचे काम तातडीने हाती घ्या, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना त्यांनी दिले होते. दादाजी खोब्रागडे यांच्या कार्याची घेतली दखल ज्यांनी एचएमटी धानाच्या वाणाचा शोध लावला आणि ज्यांची दखल 'फोर्ब्स' मॅगझिनने घेतली होती ते चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्याच्या नांदेड गावचे प्रगतीशील शेतकरी स्व. दादाजी खोब्रागडे यांची भेट घेण्यासाठी अजित पवार आले होते. दूरवर असलेल्या लहानशा गावात जाऊन अजित पवार यांनी त्यांचा सत्कार केला. धानाच्या अधिक विकसित वाणाचे संशोधन करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने त्यांना ५ लाख रूपयांचा धनादेश आणि ५ एकर जमीनही त्यावेळी पवार यांनी त्यांना दिली होती. शेतकरी आणि शेती यांची जाण असलेला हा नेता होता.

# प्रजासत्ताक दिनी ४ वर्षांच्या अधीर चा तिरंग्यावरील वेग

## इनलाईन स्केटिंग करत अवघ्या ७ मिनिटांत पूर्ण केला ऐतिहासिक प्रवास

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२८, चंद्रपूर :** प्रजासत्ताक दिनाच्या पावन पर्वावर अवघ्या ४ वर्षांच्या अधीर अमृता सुबोध जुन्नावार याने आपल्या धाडसी आणि देशभक्तीपूर्ण कृतीने चंद्रपूर शहराचे लक्ष वेधून घेतले. गांधी चौक ते जटपुरा गेट या मार्गावर हातात तिरंगा घेत इनलाईन स्केटिंग करत अवघ्या ७ मिनिटांत हे अंतर पूर्ण करत अधीरने उपस्थित नागरिकांमध्ये देशप्रेमाची भावना जागृत केली. इतक्या लहान वयात दाखवलेला आत्मविश्वास, शिस्त आणि शारीरिक तंदुरुस्ती सर्वांसाठी प्रेरणादायी ठरली. रस्त्याच्या दुतर्फा उभ्या असलेल्या नागरिकांनी अधीरच्या या अनोख्या देशभक्तीपर पराक्रमाचे टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले. वंदे मातरम् आणि भारत माता की जयच्या घोषणांमध्ये हा क्षण अविस्मरणीय ठरला.



अधीर जुन्नावार हा चंद्रपूर शहरातील माउंट कार्मेल कॉन्वेंट स्कूल येथे नर्सरी वर्गात शिक्षण घेत असून, इतक्या लहान वयात त्याने क्रीडा क्षेत्रात राष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. नुकत्याच पार पडलेल्या 'अचिव्हर्स ऑलिम्पियाड' या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदक मिळवणारा तो या वयोगटातील पहिला विद्यार्थी ठरला आहे. या यशाबद्दल माउंट कार्मेल कॉन्वेंट शाळेत आयोजित विशेष कार्यक्रमात थॉमस चर्च तुकूमचे फादर बिपीन यांच्या हस्ते अधीरला पदक, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करून गौरविण्यात आले.

यावेळी मुख्याध्यापिका सिस्टर कॅथरीन, वर्गशिक्षिका मीनाक्षी, शिक्षकवर्ग, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याशिवाय दैनिक भास्करच्या वतीने नागपूर येथे आयोजित इनलाईन स्केटिंग स्पर्धेत देखील अधीरने उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या उत्कृष्ट कामगिरीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्या स्पर्धेतही त्याला पदक देऊन सन्मानित करण्यात आले होते.

अधीरच्या या यशामागे त्याची जिद्द, सातत्यपूर्ण सराव, योग्य मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले आहे. अधीरच्या या उज्ज्वल यशामुळे जुन्नावार कुटुंबासह संपूर्ण चंद्रपूर शहराचा अभिमान वाढला असून, भविष्यात तो देशपातळीवर आणखी मोठी कामगिरी करेल, असा विश्वास पालक, शिक्षक आणि प्रशिक्षकांनी व्यक्त केला आहे.

# जनसेवेसाठी तत्पर लोकनेता, सहृदय मित्र गमावला - आ.मुनगंटीवार यांची शोकभावना

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२८, चंद्रपूर :** कै.अजितदादा पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणातील एक अभ्यासू, अनुभवी आणि ठाम विचारांचे नेतृत्व होते. मतभेद असले तरी विचारांचा आदर राखणे, आणि राजकारणाच्या पलीकडे जाऊन माणुसकी जपणे – ही त्यांची खरी ओळख होती. त्यांच्या जाण्याने राजकीय क्षेत्रात एक स्पष्ट वक्ता, आणि वैयक्तिक आयुष्यात एक सहृदय मित्र आपण गमावला आहे, अशा शब्दात माजी मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी शोकभावना व्यक्त केली व्यक्त केली आहे. अजितदादांचा स्वभाव हा नेहमीच स्पष्ट आणि निर्भीड वक्तेपणाचा राहिला. जे योग्य वाटे ते त्यांनी कोणताही आडपडदा न ठेवता मांडले. सत्ता, विरोध किंवा समीकरणे यापेक्षा जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देणारी त्यांची भूमिका अनेकदा राजकीय चर्चांना दिशा देणारी ठरली. मतभिन्नता असून ही परस्पर सन्मान राखण्याची त्यांची शैली आजच्या राजकारणात दुर्मिळ म्हणावी अशी होती.

विधानसभा असो वा सार्वजनिक व्यासपीठ त्यांचे बोलणे ठाम, मुद्देसूद आणि आशयघन असे. राजकारण हे केवळ पदांचे नव्हे, तर मूल्यांचे असते, ही जाणीव त्यांच्या वागण्यातून कायम प्रकट होत असे. त्यामुळेच सहकारी असोत वा विरोधक, सर्वांच्या मनात त्यांच्याविषयी आदराची भावना होती. विकासासाठी प्रत्येकाला मदत करण्याचा त्यांचा स्वभाव होता. दातृत्व या शब्दातला दा हा दादा या विशेषणात दडला आहे. व्यक्तिगत पातळीवर ते एक आपुलकीचे, संवेदनशील आणि विश्वासू मित्र होते.

राजकीय मतभेद कधीही वैयक्तिक नात्यांच्या आड येऊ नयेत, हा त्यांचा आग्रह होता. अनेकदा त्यांच्या स्पष्ट, प्रामाणिक शब्दांनी मार्गदर्शन लाभले; आज तेच शब्द आठवणींतून अंतःकरणाला भिडत आहेत. आज अजितदादा आपल्यात नाहीत, याची जाणीव मन सुन्न करणारी आहे. आबालवृद्ध यासाठी नेहमी तत्पर राहणारा त्यांचा अजितदादा, सकाळी ६ वाजता पासून जनसेवेसाठी तत्पर राहणारा हा लोकनेता आता आपल्यात नाही ही कल्पना सहन होत नाही. त्यांचा आवाज शांत झाला असला, तरी त्यांनी जपलेले मूल्य, त्यांची राजकीय भूमिका आणि माणुसकीचा वारसा कायम स्मरणात राहील.

कै.अजितदादा पवार यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना. त्यांच्या कुटुंबीयांना, सहकाऱ्यांना व असंख्य समर्थकांना हे दुःख सहन करण्याचे बळ मिळो. अजितदादांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो असे आ. सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटले आहे.

# थोडक्यात

## शोकसंदेश; संवेदनशील नेतृत्वाचा अस्त - आ.जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२८, चंद्रपूर :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुःखद निधनाने महाराष्ट्राच्या राजकारणातच नव्हे, तर देशाच्या राजकारणात आणि सामाजिक क्षेत्रात अपूरणीय पोकळी निर्माण झाली आहे. सामाजिक भान, अनुभव आणि नेतृत्वगुण असलेला एक मोठा नेता आज आपल्यातून निघून गेला आहे. माझ्यासारखा कार्यकर्ता पुढे गेला पाहिजे असे ते नेहमी मनापासून म्हणायचे. मी भारतीय जनता पक्षाकडून निवडणूक लढवावी, अशी त्यांची इच्छा होती. अनेक वेळा त्यांनी मला वैयक्तिक पातळीवर मार्गदर्शन केले; त्यांच्या शब्दांनी आणि विश्वासाने मला नेहमीच बळ दिले. त्यांनी माझ्या निवासस्थानी भेट देत 'अम्मा का टिफिन या सेवाभावी उपक्रमाबाबत सविस्तर माहिती जाणून घेतली होती. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत सेवा पोहोचवण्याची त्यांची तळमळ आणि संवेदनशीलता त्या भेटीतून प्रकर्षाने जाणवली. अजित पवार हे नेहमी स्पष्ट आणि ठाम भूमिका मांडणारे नेतृत्व होते. होणारे काम असेल तर ते निर्भीडपणे हो म्हणायचे, आणि जे शक्य नाही त्यासाठी स्पष्टपणे नाही सांगण्याचे धाडस त्यांच्याकडे होते. शब्दांची गुंडाळी न करता, वास्तव स्वीकारून निर्णय घेणारा हा स्वभावच त्यांना वेगळा ठरवणारा होता. ही प्रामाणिकता आणि स्पष्टवक्तेपणा आजच्या राजकारणात दुर्मिळ आहे. एक संवेदनशील, कार्यकर्त्यांवर विश्वास ठेवणारा आणि सामाजिक बांधिलकी जपणारा नेता देशाने गमावला आहे. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून न निघणारी आहे. स्व. अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. ईश्वर त्यांच्या पवित्र आत्म्यास सद्गती देवो आणि त्यांच्या कुटुंबियांना, समर्थकांना व लाखो चाहत्यांना हे दुःख सहन करण्याचे बळ देवो हीच माता महाकाली चरणी प्रार्थना करतो.

## अजित दादांच्या जाण्याने मनाला चटका - पंकजा मुंडे

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२८, मुंबई :** दादा अशी एक्झिट घ्यायची नव्हती!! ... तुम्ही जीवाला चटका लावून गेलात... तुम्ही सदैव स्मरणात रहाल.. तुमच्याबरोबर प्रवास केला, चर्चा केल्या, अगदी गप्पाही खूप मारल्या.. तुमचा राजकीय आणि ॲकडमिक सेन्स खूप जबरदस्त होता. तुमच्या भाषणातून, विनोद बुद्धीने तुम्ही अनेकांना स्पष्ट बोलूनही हसवलं.. पण आज तुमच्या जाण्याने तुम्ही कार्यकर्त्यांना रडवलं.. असा अनुभवी नेता होणे नाही.. महाराष्ट्र एका डायनॅमिक नेत्याला मुकला.. गोपीनाथ मुंडे परिवारातर्फे आदरांजली, अशा शब्दांत पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग व पशुसंवर्धन विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे यांनी श्रद्धांजली वाहिली.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर शोकाकुल झालेल्या पंकजा मुंडे यांनी अजित दादांना भावपूर्ण शब्दांत आदरांजली वाहिली.

मुंडे म्हणाल्या की, अजितदादांनी आपल्या कामाने, आपल्या वागण्याने राज्याच्या राजकारणात एक वेगळा दरारा निर्माण केला होता. राजकारणात शब्दांला जागणारे म्हणून सर्वांनाच ते परिचत होते. जनतेत रमणारा, जनतेसाठी झटणारा हा लोकनेता आज आपल्यात नाही, यावर विश्वास बसत नाही.

कुशल प्रशासक, दिलेला शब्द पाळणारे व कामाप्रती प्रचंड निष्ठा असलेले व्यक्तिमत्व म्हणून उपमुख्यमंत्री अजित पवार यांना ओळखले जाते. अशा अजित दादांच्या अकाली निधनाची बातमी मनाला चटका लावणारी आहे. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्रातील सुसंस्कृत दादा व्यक्तिमत्व हरपले. आपल्या अभ्यासू वृत्तीने व कामाच्या झपाट्याने वेगळा ठसा उमटविणाऱ्या दादांना महाराष्ट्र विसरू शकत नाही. हे दुःख पचविण्याची ताकद परमेश्वर पवार कुटुंबियांना देवो, अशा शब्दांत मुंडे यांनी शोक व्यक्त केला.

## शुक्रवारी ठाण्यात पाणी नाही

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२८, ठाणे :** येत्या शुक्रवार, दिनांक ३० जानेवारी २०२६ रोजी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पाणी पुरवठा योजनेच्या अंतर्गत जांभूळ जलशुध्दीकरण केंद्रातील जलाशय येथे बारवी गुरूत्व वाहिन्याचे उन्नतीकरण आणि तातडीचे देखभाल दुरूस्तीचे काम हाती घेण्यात येणार आहे. परिणामी, ठाणे शहरातील काही भागांसह कळवा, मुंब्रा आणि दिवा शहरात गुरूवारी रात्री १२ वाजल्यापासून ते शुक्रवार, दिनांक ३० जानेवारी २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत एकूण २४ तास पाणीपुरवठा बंद राहणार आहे. ठाणे महानगरपालिका क्षेत्रात मुंब्रा, दिवा, कळवा, माजिवडा, मानपाडा व वागळे (काही भागात) प्रभाग समितीमध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत पाणीपुरवठा करण्यात येतो. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पाणी पुरवठा योजनेच्या अंतर्गत देखभाल दुरूस्तीचे काम हाती घेण्यात येणार आहे. त्यामुळे गुरूवारी रात्री १२ वाजल्यापासून ते शुक्रवारी रात्री १२ वाजेपर्यंत ठाणे महापालिका क्षेत्रातील काही भागात पाणीपुरवठा बंद राहणार आहे. यामध्ये प्रामुख्याने दिवा, मुंब्रा (प्रभाग क्र. २६ व ३१ चा काही भाग वगळता) आणि कळवा प्रभाग समितीमधील सर्व भागामध्ये व वागळे प्रभाग समिती मधील रुपादेवी पाडा, किसननगर नं. २, नेहरुनगर तसेच मानपाडा प्रभाग समिती अंतर्गत कोलशेत खालचा गाव येथील पाणीपुरवठा २४ तासासाठी पूर्णपणे बंद राहणार आहे. पाणीपुरवठा सुरू झाल्यानंतर पुढील १ ते २ दिवस कमी दाबाने पाणीपुरवठा होईल याची नागरिकांनी नोंद घ्यावी. तसेच पाणी कपातीच्या कालावधीत नागरिकांनी पाणी काटकसरीने वापरुन ठाणे महापालिकेस सहकार्य करावे असे आवाहन महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागातर्फे करण्यात आले आहे.

## मुंडे महाविद्यालयात 'प्रजासत्ताक दिन' साजरा

**अक्षराज : उमेश तबीब**

**दि.२८, मंडणगड :** मंडणगड येथील सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाच्या लोकनेते गोपीनाथजी मुंडे कला, वाणिज्य व विज्ञान महाविहद्यालयात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वाल्मिक परहर यांचे शुभ हस्ते ध्वजारोहण करुन '७७ वा भारतीय प्रजासत्ताक दिन' मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य डॉ. विष्णु जायभाये, माजी विद्यार्थी राजेश पारेख, पंदेरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. तौफिक शेख, आरोग्यसेविकासंगीता मेंढे आदी मान्यवर उपस्थित होते.

ध्वजारोहणानंतर पंदेरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. तौफिक शेख यांनी उपस्थित सर्वांना कुष्ठरोगाबद्दल समाजामध्ये जागरुकता निर्माण होण्याच्या दृष्टीने व 'स्पर्श कुष्ठरोग जागरुकता' अभियानातंर्गत 'कुष्ठरोग मुक्ती' प्रतिज्ञा दिली. तर कु. आर्या कदम हिने १०० टक्के साक्षरतेचे ध्येय साध्य करण्यासाठी 'मी निरक्षरता दूर करेन आणि माझ्या आसपासच्या प्रत्येक व्यक्तीला साक्षर करेन' असी 'साक्षरता शपथ' दिली.

कार्यक्रमास संस्थेचे पदाधिकारी, एन.एस.एस. कार्यक्रमाधिकारी डॉ. महेश कुलकर्णी, प्रा. अशोक कंठाळे, डॉ.दगडू जगताप तसेच शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी वर्ग उपस्थित होता.